नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २९/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील एसटी बसस्टॅन्ड सावनेर येथे दि. २८/०७/२०२२ चे २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अजय महादेव शिरसात, वय २४ वर्ष, रा. अंबोली पोस्ट येनीकोनी नरखेड हे सावनेर येथील एसटी बस स्टॅन्ड मध्ये झोपले असता त्याठिकाणी आरोपी क्र. १. अखिलेश उर्फ माया सुखनंदन बुधोलीया वय २५ वर्ष, रा. पहलेपार सावनेर, २. रितिक धनराज कछवा वय २१ वर्ष, रा. किल्लापुरा वार्ड क्र. १३ सावनेर व वय १६ वर्षीय विधीसंघर्ष बालक यांनी फिर्यादींना हाताने व पटयांने मारहाण करून त्यांचे पॅटच्या खिशातील जिओ कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे १,०००/—रू. काळे रंगाचे पाकिट त्यात आधार कार्डची झेरॉक्स बेन्टेक्स सोनेरी रंगाचा बदाम ईतर कागदपत्रे व रोख रक्कम ७१०/—रू. बळजबरीने मारहाण करून हिसकावुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नागवे मो. क्र. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा हवामहल वलनी येथे दि. २७/०७/२२ ते दि. २८/०७/२२ चे १८.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— ग.भा. रमावती भगत केवट, वय ६० वर्ष, रा. हवामहल वलनी यांच्या गोठयामध्ये बांधुन ठेवलेला काळा रंगाचा बकरा अज्ञात आरोपीने गोठयाचे दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून किमती १२,०००/—रू. चा बकरा चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी**:— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील प्राईल मेटल इंडस्ट्रिज एमआयडीसी बोरी येथे दि. २७/०७/२२ चे ०१.०० वा. ०१.३० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने कंपणीचे मागिल भिंतीवरुन आतमध्ये प्रवेश करुन ॲल्युमिनिअमचे ७० ते ८० विटा कि. ३५,०००/—रु. चा मुद्देमाल चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— जितेन्द्र वामनराव बुजरूक वय ४४ वर्ष रा.प्लाट नं. ६३, शारदा नगर नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भास्कर मेटकर मो.क्र. ९९२३७४०२४० हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

१) पो.स्टे. सावनेर – दिनांक २४/०७/२०२२ चे १४.०० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– सतीश उदयभान गजभिये, रा. केळवद याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री दोनोडे मो.क्र. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. बुटीबोरी – दिनांक २६/०७/२०२२ चे १६.०० वा. चे सुमारास पो.स्टे. बुटीबोरी हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार खंडारे मो.क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत नरहर शिवार दिनांक २७/०७/२०२२ चे १०.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान **समीर चंद्रभान अडमाची(मृतक), वय १४ वर्ष, रा. नरहर नदी** याने लागुन असलेला आडीमोडी नाल्याच्या पाण्याच्या पात्रात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामबली निर्मल उईके, वय ३२ वर्ष, रा. नरहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार वरकडे मो. क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील येनवा येथे फिर्यादी नामे– राहुल बालाजी वाघमारे, वय ३४ वर्ष, रा. वार्ड नं २, येनवा ता. काटोल यांची पत्नी नामे **सौ. प्रिया राहुल वाघमारे(मृतक), वय २४ वर्ष, रा. वार्ड नं २, येनवा** हीला मानसिक आजार असल्याने ती नेहमी चिडचिड करीत होती. तिचा मानसिक आजाराचा उपचार मेडीकल कॉलेज नागपुर येथे सुरू होता व तिला मानसिक आजाराच्या गोळया औषधी सुरू होत्या. दिनांक २८/०७/२०२२ चे १७.१५ वा. ते १७.३० वा. सुमारास फिर्यादी हे घरी हजर नसतांना त्यांची पत्नी सौ. प्रिया हिने मानसिक आजारामध्ये घरासमोरील विहीरीत उडी मारून विहीरीतील पाण्यात बुडून मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री दत्तात्रय कोलटे मो.नं. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर